**नागपूर येथे हज हाऊस बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन निर्णय, क्रमांक:हज-२००४/४४२/प्र.क्र.३७/०४/३५**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ११ नोव्हेंबर, २००५.

**वाचा :-** १) सा.प्र.वि., शासन निर्णय, क्र.हज-२००४/मुमंस-३२/प्र.क्र.२१/२००४/३५, दि.१० ऑगस्ट, २००४.

२) अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे क्र.संकीर्ण-१००५/प्र.क्र.१७/अर्थोपाय, दि.१७.१०.२००५ चे पत्र.

३) सा.प्र.वि., शासन परिपत्रक क्र.पूरक-१००५/१३४६/प्र.क्र.९८/२००५/२५, दि.२६.१०.२००५.

४) कार्यकारी अभियंता, एकात्मिक घटक (वैद्यकीय) सार्वजनिक बांधकाम, नागपूर यांचे कार्यकारी अधिकारी, म.रा.हज समिती, मुंबई यांना अग्रेषित केलेले क्र.(क्यू)/आयुएन/ता/२००५, दि.४.१०.२००५ चे पत्र.

५) कक्ष अधिकारी, म.रा.हज समिती यांचे क्र.१३६४४, दि.५.१०.२००५ चे पत्र.

## शासन निर्णय

केंद्र शासनाने सन २००२ पासून नागपूर येथून हज यात्रेस जाण्यासाठी नागपूर ते जेद्दाह अशी थेट उड्डाणाची (विमानसेवा) सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. सदर सेवेचा फायदा महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाड्यासह शेजारील छत्तीसगड, मध्यप्रदेश, ओरिसा व आंध्रप्रदेश या राज्यातील हज यात्रेकरूंनाही होतो. दरवर्षी नागपूर येथून सुमारे २ ते ३ हजार यात्रेकरू हज यात्रेसाठी जातात. हज यात्रेच्या कालावधीत हज यात्रेकरूंना मोफत निवास, प्रयाण व आगमन यांच्यासाठी आवश्यक त्या सुविधा इत्यादी सोयी हज समितीतर्फे उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामुळे नागपूर येथे यात्रेकरूंच्या सोयीसाठी हज हाऊस बांधणे आवश्यक आहे. सदर हज यात्रेकरूंना प्रयाण तसेच आगमनानंतर निवास, तसेच इतर प्रवासानुषंगिक सुविधा उपलब्ध करण्याकरिता कायम स्वरुपाचे हज हाऊस बांधण्यास राज्य शासनाने शासन निर्णय, दि.१० ऑगस्ट, २००४ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

२. नागपूर येथील हज हाऊसचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात यावे. हज यात्रेच्या कालावधीसाठी सदर इमारत हज यात्रेकरूंसाठी उपयोगात आणली जावी व उर्वरित कालावधीत सदर इमारत शासकीय कार्यालयासाठी उपलब्ध करून द्यावी.

३. नागपूर येथे हज हाऊस बांधण्याकरिता सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक-१००५/१३४६/प्र.क्र.९८/२००५/२५, दि.२६.१०.२००५ अन्वये रु.२.०० कोटीची (अक्षरी रुपये

दोन कोटी फक्त) पुरवणी अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. वित्त विभागाच्या क्र.संकीर्ण-१००५/प्र.क्र.१७/अर्थोपाय, दि.१७ ऑक्टोबर, २००५ च्या अर्धशासकीय पत्रातील परिच्छेद क्र.१ व २ (अ) (क) नुसार तसेच कार्यकारी अभियंता, एकात्मिक घटक (वैद्यकीय) सार्वजनिक बांधकाम, नागपूर यांचे कार्यकारी अधिकारी, म.रा.हज समिती, मुंबई यांना अग्रेषित केलेले क्र.(क्यू) आयुएम/ता/२००५, दि.४.१०.२००५ च्या पत्रातील मागणीनुसार रु.५०.०० लाख (रुपये पन्नास लाख फक्त) इतके अनुदान ठेव अनुदान स्वरुपात त्यांच्या स्वाधीन करण्यात येत आहे.

४. हा खर्च मागणी क्र. ए-५, प्रधानशीर्ष २२५०-इतर सामाजिक सेवा ८००-इतर खर्च, राज्य योजनान्तर्गत योजना (००) (०२) हज समितीस सहायक अनुदान (२२५०-०२४-६) योजनांतर्गत दत्तमत या लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा व २००५-२००६ या वित्तीय वर्षातील मंजूर पूरक अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने, त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ ५८२/०५/व्यय-४, दि.१५.११.२००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सुवधात्रक

(सु. व. धात्रक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति.

प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर,
कोषागार अधिकारी, नागपूर,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.राज्यमंत्री (सामान्य प्रशासन विभाग) यांचे स्वीय सहायक,
कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई,
उप सचिव, वित्त विभाग/व्यय-४, अर्थोपाय, मंत्रालय, मुंबई,
उप सचिव, नियोजन विभाग/का.१४११, मंत्रालय, मुंबई,
उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का.२५, मंत्रालय, मुंबई,
उप सचिव, महसूल व वन विभाग/ज-८, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती.